Finance | ~~S.C.~~

Circulars

राज्यातील सहकारी साखर कारखान्यांनी द्यावयाच्या अंतिम ऊसदराबाबत.

महाराष्ट्र शासन

साखर आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,

साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे ४११००५

Circular

परिपत्रक क्र.साआ/प्र.क्र.५/कक्ष-७/अर्थ-१/२०११ दिनांक २४/११ /२०११

ऊस नियंत्रण आदेश १९६६ मधील तरतुदीनुसार साखर कारखान्यांनी केंद्र शासनाने जाहीर केलेल्या एफ.आर.पी (Fair and Remunerative Price) इतकी किमान ऊसाची किंमत ऊस दिल्यापासून चौदा दिवसात ऊस पुरवठादरांना देणे बंधनकारक आहे. राज्यातील सहकारी साखर कारखान्यांकडे गाळपासाठी ऊस पुरवठा करणाऱ्या ऊस उत्पादकांना कारखाने दोन / तीन हप्त्यांमध्ये ऊसदर अदा करत असतात. ऊसदराचा अंतिम हप्ता देताना कारखान्याच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन तसेच संबंधित हंगामातील कारखान्याच्या सर्व स्त्रोतांपासून मिळालेल्या समग्र उत्पन्नातून ( उपपदार्थ विक्रीतुन येणाऱ्या उत्पन्नासह) हंगामातील सर्व खर्च वजा जाता व सर्व प्रकारच्या वैधानिक व मा.मंत्री समितीने मान्य केलेल्या आवश्यक त्या तरतुदी केल्यानंतर , तसेच सर्व देय कर्जाच्या तरतुदी केल्यानंतर **उत्पन्नातून वाढावा निघत असल्यास वाढीव ऊसदर देता येईल**.तथापि ऊसाचा अंतिम दर देण्यापूर्वी कारखान्यांनी **साखर आयुक्तालयाची पुर्वमान्यता घेणे आवश्यक आहे** अशा सुचना दरवर्षी होणाऱ्या मा. मंत्री समितीच्या बैठकीमध्ये निर्गमित केल्या जातात.

मात्र साखर आयुक्तालयाच्या निदर्शनास आले आहे की, बहुतांश सहकारी साखर कारखाने ऊसाचे अंतिम हप्ते दिल्यानंतर कार्योत्तर मंजूरीसाठी अंतिम ऊसदर प्रस्ताव सादर करतात किंवा अंतिम हप्ता देण्याचे अगोदरच उत्पन्नापेक्षा जास्त रक्कम दिली जाते आणि त्यानंतर अंतिम ऊसदराचे प्रस्ताव सादर केले जातात. सदर प्रस्तावांची छाननी क रताना त्यामध्ये अनेक त्रुटी निदर्शनास येतात ज्यामुळे कारखान्याचा प्रस्ताव मान्य करणे शक्य होत नाही. यामध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे या कार्यालयाच्या निदर्शनास आल्या आहेत.

१) सहकारी साखर कारखान्यांचे अंतिम ऊसदर मंजूरीचे प्रस्ताव विहीत मुदतीत व साखर आयुक्तालयाने विहीत केलेल्या नमुन्यात सादर केले जात नाहीत.

२) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदीनुसार कारखान्यांनी त्यांचे ताळेबंदामध्ये विविध निधींची तरतुद करणे आवश्यक आहे. जसे संशयीत बुडीत निधी, भाग विमोचन निधी , घसारा निधी , शासकीय देणी परतफेड करण्यासाठी निधी इत्यादी .सदर तरतुदी ताळेबंदामध्ये दिसून येत नाहीत.

३) मा.मंत्री समितीने दरवर्षी सुचित केलेल्या तरतुदी जसे मुख्यमंत्री सहाय्यता निधी, पुर्व हंगामी खर्चासाठी निधी, कामगारांची थकीत देणी भागविण्यासाठी निधी, वित्तीय संस्थांच्या कर्ज परतफेडीसाठी निधी इत्यादींची तरतुद ताळेबंदात केलेली नसते.

४) ताळेबंदामध्ये अनेकदा संचित तोटा दिसुन येतो.तथापि तोटयासाठी ताळेबंदामध्ये तरतुद केलेली नसते.

५) वित्तीय संस्था व शासनाची थकबाकी नसल्याचा दाखला जोडलेला नसतो.

६) कारखान्याने सभासदांकडून घेतलेल्या ठेवींची मुदत संपल्यानंतरही ठेव तसेच त्यावरील व्याजाची परतफेड केलेली नसते.

७) कारखान्याचे अंतिम ऊसदर मान्यतेचे प्रस्ताव कारखान्याचे विशेष लेखापरीक्षक व संबंधित प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे मार्फत न पाठवता थेट साखर आयुक्तालयामध्ये पाठविले जातात.

८) **कारखान्यांना व्यवहारीक नफा झालेला नसताना , कारखान्याच्या उत्पन्नापेक्षा जास्त दराने अंतिम ऊसदर अदा केला जातो.**

९) अनेकदा अंतिम ऊसदर मान्यतेचे प्रस्ताव फार उशिराने पुढील आर्थिक वर्ष उलटून गेल्यानंतर सादर केले जातात. म्हणजे अगोदरच जास्त रक्कम अदा केली जाते व त्यानंतर अंतिम हप्त्याच्या मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविले जातात. दरम्यानच्या काळात कारखान्याने ताळेबंदामधील अनेक खर्चासाठी सर्वसाधारण सभेची मंजूरी घेतलेली असते. अशा परिस्थितीमध्ये अंतिम ऊसदर मान्यतेसाठीचा प्रस्ताव साखर आयुक्तालयाकडे सादर झाल्यानंतर ताळेबंदामध्ये काही त्रुटी आढळून आल्यास त्याची पुर्तता करणे अवघड होऊन बसते. सर्वसाधारण सभेने पूर्वीच मान्यता दिली असल्याने ताळेबंद दुरुस्त (Recast) करता येत नाही. अशा प्रकारच्या दुषित ताळेबंदामुळे कारखान्याचे वास्तव आर्थिक चित्र सादर केले जात नाही.

परिणामस्वरुप सदरचे अंतिम ऊसदर प्रस्ताव या कार्यालयास अमान्य करावे लागतात. त्यामुळे कारखान्याच्या ताळेबंदामध्ये अनिष्ट तफावत निर्माण होते आणि शेतकरी किंवा इतर संघटनांकडून तक्रारीला वाव मिळतो.

वास्तविक पाहता सहकारी साखर कारखान्याचा ताळेबंद महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० मधील तरतुदी व दरवर्षी मा.मंत्री समितीने दिलेल्या निर्देशानुसार तयार करण्याची **जबाबदारी प्रामुख्याने कारखान्याचे मुख्य लेखापाल व कार्यकारी संचालक यांची आहे.** त्यांनी उपरोक्त प्रमाणे कारखान्याचा ताळेबंद तयार करुन तो संचालक मंडळाच्या मान्यतेसाठी ठेवणे अपेक्षित आहे. तसेच कारखान्याच्या उत्पन्नातुन वाढावा निघत नसेल व **अतिरीक्त ऊसदर देणे शक्य होत नसेल तर सदर बाब संचालक मंडळाच्या निदर्शनास आणून देणे ही कार्यकारी संचालकाची जबाबदारी आहे.** मात्र अनेक प्रकरणांमध्ये अशी कार्यवाही केल्याचे दिसुन येत नाही.

तरी याबाबत आपणास गांभिर्याने सुचित करण्यात येते की, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व मा. मंत्री समितीने निर्देशीत केल्यानुसार सर्व कायदेशीर व इतर तरतुदी ताळेबंदामध्ये केल्यानंतर उत्पन्नातुन वाढावा निघत असल्यास; साखर आयुक्तालयाची पुर्वमान्यता घेतल्यानंतरच ऊस पुरवठादारांना ऊसाचा अंतिम हप्ता अदा करावा. **कोणत्याही परिस्थितीत कारखान्याला तोटा करुन वाढीव ऊसदर देवू नये.** अंतिम ऊसदर मान्यतेसाठी **प्रस्ताव चालू गळीत हंगाम संपल्यानंतर व पुढील गळीत हंगाम सुरु होण्यापूर्वी , विशेष लेखापरीक्षक व प्रादेशिक सहसंचालक (साखर) यांचे मार्फतच** साखर आयुक्तालयाकडे सादर करावेत. उपरोक्त सुचनांचे उल्लंघन होणार नाही याची वैयक्तिक जबाबदारी संबंधित कार्यकारी संचालकाची राहील याची संबधितांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

**साखर आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य, पुणे.**

प्रति,

१) कार्यकारी संचालक

------------------------------- सहकारी साखर कारखाना लि.

--------------------- तालुका----------------जिल्हा ------------------

२) प्रादेशिक सहसंचालक (साखर) सर्व ----------------------

३) विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था (साखर) सर्व -----------------